सर्फनाला मध्यम प्रकल्पातील बाधितांच्या पुनर्वसनासाठी मौजे देवर्डे येथील क्षेत्र २१.५९ हे.आर आणि मौजे पारपोली येथिल क्षेत्र ४०.५३ हे. आर या गायरान जमीन उपलब्ध करून देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.जमिन.३८१७/प्र. क्र.२०२/ज-५ अ
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ०३२.
दि.२८/०५/२०१९.

वाचा :- १) विभागीय आयुक्त, पुणे यांचा प्रस्ताव क्र. मह /२/ जमीन- को/ कावि /१३ / २०१८, दि.२६/०२/२०१८.
२) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र.कार्यासन-३ इ/ जमिन/आरआर /३७ /२०१८, दि.०४/०१/२०१८.
३) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र.कार्यासन-३ इ/ जमिन/ आरआर-९७७८/ २०१७, दि.०३/०५/२०१८

प्रस्तावना :-

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्फनाला प्रकल्पातील बाधितांच्या पुनर्वसनासाठी प्रकल्पग्रस्तांच्या पसंतीनुसार पर्यायी जमीन वाटप करून पुनर्वसन करण्याकरिता मौजे देवर्डे, ता. आजरा, जि. कोल्हापूर येथील गट क्र.३०९ क्षेत्र ११ हे. ८६ आर व गट क्र.३३९ चे क्षेत्र ०९ हे ७३ आर असे एकूण क्षेत्र २१ हे ५९ आर तसेच पारपोली, ता. आजरा जि. कोल्हापूर येथील गट क्र.५९ क्षेत्र ७ हे. ०८ आर व गट क्र.१२५ क्षेत्र ३३ हे. ४५ आर असे एकूण क्षेत्र ४० हे. ५३ आर एवढी गायरान जमीन सर्फनाला मध्यम प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी "प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन" या सार्वजनिक प्रयोजनार्थ प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २६ एप्रिल, २०१७ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २२ नंतर गायरान जमिनींचे वापरातील परिवर्तनाबाबत कलम २२ अ समाविष्ट करणेत आले आहे. उक्त कलम २२ अ मधील अ. क्र.६ अन्वये " जमिनीचे कोणतेही वापरातील परिवर्तन, प्रदान किंवा पट्टयाने प्रदान हे, राज्य शासनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून केले जाणार नाही आणि कलम ३३० अ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, या कलमाखालील राज्य शासनाचे अधिकार त्यास दुय्यम असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा इतर प्राधिकाऱ्याकडे सोपविण्यात येणार नाही ." असे नमूद केले आहे. त्यानुसार राज्य शासनासप्राप्त अधिकारांनुसार ग्रामविकास विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

मौजे देवर्डे, ता. आजरा, जि. कोल्हापूर येथील गट क्र.३०९ क्षेत्र ११ हे. ८६ आर व गट क्र.३३९ चे क्षेत्र ०९ हे ७३ आर असे एकूण क्षेत्र २१ हे ५९ आर तसेच मौजे पारपोली, ता. आजरा जि. कोल्हापूर येथील गट क्र.५९ क्षेत्र ७ हे. ०८ आर व गट क्र.१२५ क्षेत्र ३३ हे. ४५ आर असे एकूण क्षेत्र ४० हे. ५३ आर एवढी गायरान जमीन महसूलमुक्त व भोगवटारहित कब्जेहक्काने कोल्हापूर जिल्ह्यातील सर्फनाला मध्यम प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी “प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन” या सार्वजनिक प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (पुनर्वसन), कोल्हापूर यांचेकडे हस्तांतरीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

सदरहू जमिनींचे प्रकल्पग्रस्तांना वाटप करताना महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम १६ (३) मधील तरतूदींस अनुसरून जमिनींच्या कब्जेहक्काची रक्कम प्रकल्पग्रस्तांकडून वसूल करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी तथा उप संचालक पुनर्वसन, कोल्हापूर यांनी करावी.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२०१८/ सं.क्र.२६०/ व्यय-९ दि. २१.०६.२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे .

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याचा सांकेतांक क्र. २०१९०५२८१२२३०७६९१९ असा असून डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

KIRAN PANDURANG WADTE

Digitally signed by KIRAN PANDURANG WADTE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=092f3d18dd73e55dfcdc33acd72708a0290e9758bc4e1500205b182e2d843c82, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=REVENUE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN PANDURANG WADTE
Date: 2019.05.28 17:42:15 +05'30'

(कि. पा. वडते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे स्वीय सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री (महसूल) यांचे स्वीय सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे स्वीय सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
६) विभागीय आयुक्त, पुणे.
७) जिल्हाधिकारी, कोल्हापूर.
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
९) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई
१०) जलसंपदा विभाग (मप्र), मंत्रालय, मुंबई.
११) ग्राम विकास विभाग (पंरा-५), मंत्रालय, मुंबई
१२) विधी व न्याय विभाग (ए-ब्रँच), मंत्रालय, मुंबई.
१३) निवडनस्ती, कार्यासन ज-५ अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

***